# वित्त विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २ डिसेंबर २००८

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक सेवाप्र-११.०७/प्र.क्र. १९६/२/कोषा (प्रशा-३).—भारताचे संविधान याच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून,महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, स्थानिक निधी लेखा, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यातील वरिष्ठ लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक, आणि लेखापरीक्षा-लिपिक या पदांवरील सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमांना, स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा (सेवाप्रवेश) नियम, २००८, असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा " याचा अर्थ, वरिष्ठ लेखापरीक्षक, कनिष्ठ लेखापरीक्षक आणि लेखापरीक्षा-लिपिक, असा आहे आणि त्यामध्ये, या कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती किंवा बदली करण्यात येते अशा समतुल्य वेतनश्रेणीची इतर सर्व पदे यांचा समावेश होतो ;

(ख) " पदवी " याचा अर्थ, सांविधिक विद्यापीठाची पदवी, असा आहे ;

(ग) " सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ) " याचा अर्थ, त्या त्या महसूल विभागाचा सह मुख्य लेखा परीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा, असा आहे ;

(घ) " वित्त विभाग " याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा वित्त विभाग, असा आहे ;

(ङ) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(च) " उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो ;

(छ) " माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा " याचा अर्थ, महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा, असा आहे आणि त्यामध्ये, शासनाने त्यास समतुल्य म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही परीक्षा याचा समावेश होतो.

३. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील वरिष्ठ लेखापरीक्षकाच्या प्रदावरील नियुक्ती, ज्यांनी त्या त्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापरीक्षकाचे पद धारण केले असेल आणि त्या पदावर किमान तीन वर्षे इतकी नियमित सेवा केली असेल आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक व दोन), उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी

उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा कनिष्ठ लेखापरीक्षकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल.

४. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील कनिष्ठ लेखापरीक्षकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) ज्यांनी स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील लेखापरीक्षा-लिपिकाचे पद धारण केले असेल आणि ज्यांनी त्या लेखापरीक्षा-लिपिक संवर्गात तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा केली असेल, आणि ज्यांना महाराष्ट्र लेखा व स्थानिक निधी लेखा, गट-क सेवा विभागीय परीक्षा (भाग एक) उत्तीर्ण होण्यातून सूट मिळाली असेल किंवा ज्यांनी उक्त परीक्षा उत्तीर्ण केली असेल, अशा लेखापरीक्षा-लिपिकाच्या त्या त्या प्रादेशिक संवर्गातील व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (एक) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(दोन) ज्यांनी पुढील कोणतीही अर्हता, म्हणजे,—

(क) किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(ख) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह कला शाखेची पदवी ; किंवा

(ग) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन किमान ५५ टक्के इतक्या गुणांसह विज्ञान शाखेची पदवी धारण केली असेल ; किंवा

(घ) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लेखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(ङ) व्यवसाय प्रशासनाची पदवी धारण केली असेल ; किंवा

(च) कोणतीही पदवा आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(छ) संगणक तंत्रज्ञान किंवा संगणकशास्त्र किंवा माहिती तंत्रज्ञान यातील विशेषज्ञतेसह अभियांत्रिकीमधील पदवी धारण केली असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी, उप-खंड (क), (ख) आणि (ग) यांमध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल.

५. स्थानिक निधी लेखा, गट-क सेवेच्या प्रादेशिक संवर्गातील लेखापरीक्षा-लिपिकाच्या पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) त्या त्या महसूल विभागाच्या सह मुख्य लेखापरीक्षक/उप मुख्य लेखापरीक्षक (वरिष्ठ), स्थानिक निधी लेखा यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील विभिन्न कार्यालयातील गट-' ड ' मधील पद धारण केलेल्या व गट-' ड 'मधील पदावर तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा झालेल्या आणि माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केलेल्या आणि या नियमाच्या उप खंड (ख) (३) मध्ये नमूद केलेली अर्हता धारण केलेल्या व्यक्तिंमधून योग्यतेच्या अधीनतेने व ज्येष्ठतेच्या आधारे पदोन्नतीद्वारे करण्यात येईल ; किंवा

(ख) (१) ज्याचे वय ३३ वर्षांपेक्षा अधिक नसेल :

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करता येईल ; आणि

(२) ज्यांनी किमान ५५ टक्के गुणांसह माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा अशी अर्हता धारण केली असेल :

परंतु, पुढील उच्च अर्हता धारण करणाऱ्या उमेदवारांना अधिक पसंती देण्यात येईल,—

(एक) वाणिज्य हा एक विषय घेऊन उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा : किंवा

(दोन) वाणिज्य शाखेची पदवी ; किंवा

(तीन) सांख्यिकी, गणित किंवा अर्थशास्त्र असा मुख्य विषय घेऊन कला शाखेची पदवी ; किंवा

(चार) सांख्यिकी किंवा गणित असा मुख्य विषय घेऊन विज्ञान शाखेची पदवी ; किंवा

(पाच) भारतीय परिव्यय व कार्य लेखापाल संस्थेकडून घेण्यात येणारी परिव्यय लखाशास्त्राची अंतिम परीक्षा उत्तीर्ण केली असेल ; किंवा

(सहा) व्यवसाय प्रशासनाची पदवी ; किंवा

(सात) कोणतीही पदवी आणि सनदी लेखापालाची मध्यम स्तरीय परीक्षा उत्तीर्ण केली असेल :

परंतु, निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मते, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्या उमेदवारांकरिता राखून ठेवलेली रिक्त पदे भरण्यासाठी उप-खंड (ख) (२) मध्ये नमूद केलेली किमान आवश्यक अर्हता धारण करणारे पुरेसे उमेदवार उपलब्ध नसतील तर, नियुक्ती प्राधिकाऱ्यास, अशा निवडीच्या बाबतीत, गुणांची अट ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करता येईल आणि अशा जाती किंवा जमातीच्या योग्य उमेदवारांची निवड करता येईल ; आणि

(३) ज्यांनी मराठी टंकलेखन प्रति मिनिट ३० शब्द किंवा इंग्रजी टंकलेखन प्रति मिनिट ४० शब्द इतक्या वेगाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र धारण केले असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.